नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS


वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - ३५२ | Issue - 352 | वार रविवार दि. ११ मे २०२५ | Blow- Sunday Date 11 May 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# युद्ध विरामानंतर ३ तासांत पाककडून शस्त्रसंधीचे उल्लंघन

## जम्मू-काश्मीर, उधमपूर, बाडमेरमध्ये ड्रोन हल्ले, रात्रभर गोळीबार सुरुच

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: भारत आणि पाकिस्तान यांच्यात ८६ तास चाललेल्या संघर्षानंतर शनिवारी संध्याकाळी ५ वाजता शस्त्रसंधीची घोषणा झाली. दोन्ही देशांनी याबद्दलचा निर्णय घेतला. मात्र पाकिस्ताननं अवघ्या ४ तासांमध्ये शस्त्रसंधीचं उल्लंघन केलं. जम्मू-काश्मीरमध्ये पाकिस्ताननं पुन्हा एकदा गोळीबार सुरु केला आहे. पाकिस्तानकडून ड्रोन हल्लेदेखील केले जात आहेत. श्रीनगरमध्ये स्फोटांचे ४ ते ५ आवाज ऐकू आलेले आहेत. सांभा सेक्टरमध्ये सायरन वाजू लागले आहेत. पाकिस्तानी हल्ल्यांना जशास तसं उत्तर देण्याच्या सूचना सीमा सुरक्षा





दलाला देण्यात आलेल्या आहेत.

जम्मू-काश्मीरच्या सीमावर्ती भागात गोळीबार सुरु झाला आहे. शस्त्रसंधीची घोषणा होऊन अवघे तीन तास उलटले आहेत. पण पाकिस्ताननं पुन्हा एकदा आगळीक केली आहे. काश्मीरच्या बारामुला जिल्ह्यात संशयास्पद ड्रोनचा स्फोट झाला. अखनूर, राजोरी, आरएसपुरा आंतरराष्ट्रीय सीमेवर पाकिस्ताननं उखळी तोफांचा वापर सुरु केला आहे. बारामुलामध्ये ड्रोन हल्ला झालेला आहे.

जम्मूच्या पलनवाला सेक्टरमध्येही शस्त्रसंधीचं उल्लंघन झालेलं आहे. पाकिस्तानी सैन्याच्या गोळीबाराला प्रत्युत्तर देण्याचे आदेश भारतीय सैन्याला देण्यात आले आहेत. पाकिस्ताननं गोळीबार सुरु केल्यानंतर जम्मूतील बहुतांश भागात ब्लॅकआऊट करण्यात आलेला आहे. बारामुलामधील वीज पुरवठा खंडित करण्यात आलेला आहे. श्रीनगरमधील अनेक भागांमध्येही अंधार पसरला आहे.

राजस्थानच्या पोखरणमध्येही मोठ्या संख्येनं ड्रोन दिसत आहेत. हवाई सुरक्षा यंत्रणा त्यांना नष्ट करत आहे. राजोरीमध्येही गोळीबार सुरु आहे. पाकिस्तानच्या गोळीबाराला भारताकडून चोख प्रत्युत्तर देण्यात येत आहे. पाकिस्तानचे ड्रोन्स पाडण्याचं काम हवाई सुरक्षा यंत्रणेकडून केलं जात आहे. भारताची एस-४०० हवाई सुरक्षा यंत्रणा सलग चौथ्या दिवशी पाकिस्तानचे हल्ले हाणून पाडत आहे.

पाकिस्तानकडून शस्त्रसंधीचं उल्लंघन करण्यात आल्यानंतर जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी एक्सवर पोस्ट करत संताप व्यक्त केला. शस्त्रसंधीचं काय झालं, असा सवाल त्यांनी विचारला. श्रीनगरमधील अनेक भागांमध्ये स्फोटांचे आवाज ऐकू येत असल्याचं अब्दुल्ला यांनी पोस्टमध्ये म्हटलं आहे. पाकिस्तानच्या गोळीबारामुळे तणाव कायम आहे.

## खबरदार, यापुढे हल्ला कराल तर..! शस्त्रसंधीनंतर सैन्याचा इशारा; पाकच्या दाव्यांची हवा काढली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली: भारत आणि पाकिस्तान यांच्यात शस्त्रसंधीची घोषणा झाल्यानंतर संरक्षण मंत्रालयानं चालू घडामोडींबद्दल महत्त्वाची माहिती दिली आहे. कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंह यांनी पत्रकार परिषदेला संबोधित करताना पाकिस्तानकडून करण्यात आलेले दावे खोडून काढले. भारताच्या ब्रह्मोसचं नुकसान झाल्याचा, हवाई तळांचं प्रचंड नुकसान झाल्याचा दावा पाकिस्तानी सैन्याकडून करण्यात आला. त्यात काडीमात्र तथ्य नाही. हा दावा बिनबुडाचा असल्याचं कुरेशी यांनी सांगितलं. गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या संघर्षात पाकिस्तानचं प्रचंड नुकसान झालेलं आहे. लष्कर असो वा हवाई दल पाकिस्तानची मोठी हानी झालेली आहे, अशी माहिती व्योमिका सिंह यांनी दिली.

शस्त्रसंधीची घोषणा दोन्ही देशांकडून झालेली आहे. संरक्षण मंत्रालयाच्या पत्रकार परिषदेला कमांडर रघू नायरदेखील उपस्थित आहेत. पत्रकार परिषद संपत असताना नायर यांनी पाकिस्तानला सज्जड इशारा दिला. देशाच्या संरक्षणासाठी आम्ही सज्ज आहोत. यापुढे कोणतीही आगळीक केल्यास चोख प्रत्युत्तर देण्यात येईल. यापुढे हल्ला केलात खबरदार. आम्ही कोणत्याही हल्ल्याला उत्तर देण्यास पूर्णपणे सज्ज आहोत, असा थेट इशारा कमांडर रघू नायर यांनी दिला.

गेल्या काही तासांमध्ये पाकिस्तानकडून बरीच चुकीची माहिती पसरवण्यात आल्याचं म्हणत कर्नल सोफिया कुरेशींनी पाकिस्तानचा समाचार घेतला. 'जेएफ-१७ विमानानं एस-४०० आणि ब्रह्मोस क्षेपणास्त्राच्या बेसचं नुकसान केल्याचा दावा पाकिस्तानकडून करण्यात आला. तो पूर्णत: चुकीचा आहे. सिरसा, जम्मू, पठाणकोट, भुजमध्ये हल्ला केल्याचा दावादेखील खोटा आहे. चंदिगढ आणि ब्यास येथील शस्त्रागारावर केलेल्या हल्ल्याचा दावाही खोटा आहे. आपल्या सैन्याचे सगळे तळ सुरक्षित आहेत. त्यांचं कोणतंही नुकसान झालेले नाही,' अशी माहिती कुरेशी यांनी दिली. 'भारतानं मशिदींचं नुकसान केल्याचं पाकिस्तान सांगत आहे. भारत धर्मनिरपेक्ष देश आहे. भारतीय सैन्यानं आपल्या मूल्यांची झलक दाखवून दिली आहे. भारताच्या प्रत्युत्तरात पाकिस्तानी सैन्याचं नुकसान झालं आहे. भारतानं पाकिस्तानच्या स्कर्दू, जकूबाबाद, सरगोदा आणि बुलोरामधील हवाई तळाचं मोठं नुकसान केलं आहे. भारतानं पाकिस्तानच्या हवाई सुरक्षा यंत्रणा, रडार यंत्रणा फेल केल्या,' असा तपशील कुरेशी यांनी माध्यमांना दिला.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची तिन्ही लष्कर प्रमुखांसह बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दिल्ली : पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध ताणले गेले. पाकिस्तानकडून सीमेवर गोळीबार केला जात होता. ऑपेरशन सिंदूरच्या माध्यमातून भारताने पाकिस्तानमधील दहशतवाद्यांचे कंबरडे चांगलेच मोडले. मात्र, दोन दिवसांपासून पाकिस्तानकडून हल्ला केला गेला. भारताने सडेतोड उत्तर पाकिस्तानला दिले. युद्धाची स्थिती निर्माण झाली होती. शेवटी आज भारत आणि पाकिस्तानमध्ये आता शस्त्रसंधी लावण्यात आलीये. याबद्दलची माहिती परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी दिलीये.

भारत आणि पाकिस्तानमध्ये शस्त्रसंधी लावण्यात आली असली तरीही दिल्लीमध्ये



बैठकांचे सत्र सुरू असल्याचे दिसतंय. पडद्यामागील घडामोडींना प्रचंड वेग आल्याचेही बघायला मिळतंय. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, एनएसए अजित डोवाल, सीडीएस आणि तिन्ही दलांच्या प्रमुखांसोबत बैठक घेतली आहे.

या बैठकीमध्ये काय ठरणार याकडे संपूर्ण देशाच्या नजरा लागल्या आहेत. मागील काही दिवस सीमेवर अनेक घडामोडी घडताना दिसल्या. पाकिस्तानी लष्कराकडून सीमेच्या भागातील नागरिकांना टार्गेट करून गोळीबार करण्यात आला. हेच नाही तर भारतीय लष्कराने सीमा भागातील काही गावे देखील खाली केली होती. पाकिस्तानच्या गोळीबारामध्ये १७ नागरिकांचा जीव देखील गेला.

अनेक घडामोडी सुरू असतानाच नरेंद्र मोदी यांनी ही महत्वाची बैठक बोलावली आहे. सिंधू जलकराराबाबत भारताने जी भूमिका अगोदर घेतली पहलगामवरील हल्ल्यानंतर तिच भूमिका कायम असल्याचेही सांगितले जातंय. भारताने पहलगामवरील हल्ल्यानंतर पाकिस्तानचे पाणी रोखण्याचा निर्णय घेतला. पाकिस्तानमधून आलेल्या दहशतवाद्यांनी पर्यटकांना टार्गेट करत धर्म विचारून हल्ला केला. या हल्ल्याचे काही धक्कादायक असे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसली. या दहशतवादी हल्ल्यामध्ये हिंदू लोकांना टार्गेट करण्यात आले. हे दहशतवादी मागील काही दिवसांपासून घटनास्थळी रेकी करत असल्याचीही धक्कादायक माहिती ही पुढे आली होती, काही स्थानिकांनी त्यांना सहकार्य केले.

## पाकिस्तानकडून पुन्हा उल्लंघन हे अत्यंत निंदनीय, मिस्त्रींनी खडसावले; सैन्याला चोख प्रत्युत्तर देण्याचे निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : युद्धविरामानंतरही पाकिस्तानकडून शस्त्रसंधीचे उल्लंघन करण्यात आले आहे. पाकिस्तानने पुन्हा कुरापती सुरु करुन आपले रंग दाखवायला सुरुवात केली आहे. खरंतर पाकिस्तानने विनंती केल्याने द्विपक्षीय संवादातून युद्धबंदीची घोषणा करण्यात आली. आता त्याच पाकिस्तानने सीमावर्ती भागात हल्ले सुरु केले आहेत. यावर आता परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव यांनी या स्थितीबद्दल माहिती दिली आहे. विक्रम मिस्त्री म्हणताता सामंजस्य कराराचे उल्लंघन होणे हे अत्यंत निंदनीय आहे.

विक्रम मिस्त्री म्हणाले, 'गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेली लष्करी कारवाई थांबवण्यासाठी आज संध्याकाळी भारत आणि पाकिस्तानच्या डीजीएमओंमध्ये एक सामंजस्य करार झाला. गेल्या काही तासांपासून पाकिस्तानकडून या सामंजस्य कराराचे उल्लंघन केले जात आहे. भारतीय सैन्य या सीमेवरील घुसखोरीला प्रत्युत्तर देत आहे आणि त्याचा समर्थपणे सामना करत आहे. ही





घुसखोरी अत्यंत निंदनीय आहे आणि त्यासाठी पाकिस्तान जबाबदार आहे. आम्हाला वाटते की पाकिस्तानने ही परिस्थिती योग्यरित्या समजून घ्यावी आणि ही घुसखोरी थांबवण्यासाठी त्वरित योग्य कारवाई करावी.'

## पाकची विनंती, भारताकडून शस्त्रसंधी; तणाव संपला ?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्ष अखेर थांबला आहे. पाकिस्तानच्या विनंतीनंतर भारतानं शस्त्रसंधीचा निर्णय घेतलेला आहे. या वृत्ताला पाकिस्तानचे उपपंतप्रधान इशाक डार यांनी दुजोरा दिला आहे. भारतासोबत शस्त्रसंधी झाल्याची माहिती डार यांनी दिली आहे. आज संध्याकाळी ५ वाजल्यापासून शस्त्रसंधी झालेली आहे. भारत आणि पाकिस्तानचे लष्करी अधिकारी १२ मे रोजी बैठक घेणार आहेत. दोन्ही देशांनी थेट चर्चा केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचं भारताकडून सांगण्यात आलेलं आहे. पाकिस्तानच्या विनंतीवरुन सैनिकी कारवाई थांबवल्याचं भारत सरकारकडून सांगण्यात आलं आहे.

यासंदर्भात भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी माहिती दिली की, पाकिस्तानच्या लष्करी ऑपरेशन्स महासंचालकांनी आज दुपारी ३:३५ वाजता भारतीय लष्कराच्या महासंचालकांना फोन केला. दोन्ही बाजूंनी भारतीय प्रमाणवेळेनुसार सायंकाळी ५ वाजल्यापासून जमिनीवर, हवेत आणि समुद्रात सुरु असलेला गोळीबार आणि लष्करी कारवाई थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला. आजपासून सामंजस्य कराराची अंमलबजावणी करण्यासाठी दोन्ही बाजूंना सूचना देण्यात आल्या आहेत. लष्कराचे ऑपरेशन्स महासंचालक १२ मे रोजी दुपारी १२ वाजता पुन्हा चर्चा करतील. मध्यस्थी केल्याचा दावा अमेरिकेचे अध्यक्ष ऊेरश्रव ढींाि यांनी केला आहे. त्यांनी याबद्दल एक्सवर एक पोस्ट केली आहे. 'अमेरिकेनं काल रात्रभर मध्यस्थीसाठी बोलणी केली. त्यात भारत आणि पाकिस्तान पूर्ण आणि तात्काळ शस्त्रसंधीसाठी तयार झाले. त्याबद्दल मी त्यांचं अभिनंदन करतो,' अशी माहिती ट्रम्प यांनी दिली आहे. पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री इशाक डार यांनीदेखील सोशल मीडियावर याबद्दल महत्त्वाची माहिती दिली आहे. 'भारत आणि पाकिस्ताननं तत्काळ शस्त्रसंधी करण्याबद्दल सहमती दर्शवली. पाकिस्ताननं कायमच प्रदेशातील शांतता आणि सुरक्षेसाठी प्रयत्न केले आहेत. दक्षिण आशियात शांतता नांदावी यासाठी आम्ही नेहमीच आग्रही भूमिका घेतली आहे', असं डार यांनी पोस्टमध्ये म्हटलं आहे. पहलगामध्ये २२ एप्रिलला झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर दोन्ही देशातील संबंध ताणले गेले होते.

**हवामान विभागाकडून मोठी अपडेट** | **उर्वरित मे महिना कमी तापदायक**

## केरळमध्ये २७ मेपर्यंत मान्सूनचे आगमन; महाराष्ट्रातही लवकर बरसणार ?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : अंदमानच्या समुद्रात यंदा लवकर दाखल होणारा मान्सून पुढचाही प्रवास लवकर करत भारताच्या भूमीवरही लवकर दाखल होण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने शनिवारी या संदर्भातील आनंदवार्ता दिली असून २७ मे रोजी मान्सून केरळमध्ये पोहोचू शकतो. १३ मेपर्यंत दक्षिण अंदमानचा समुद्र, बंगालच्या उपसागराचा आग्नेय भाग आणि निकोबार बेटांपर्यंत मान्सून पोहोचण्याचे पूर्वानुमानही शनिवारी वर्तवण्यात आले.

केरळमध्ये दाखल होण्याचा सर्वसाधारण दिवस १ जून आहे. मात्र यंदा मान्सूनचा अंदमानच्या समुद्रापर्यंतचा प्रवासही आधी सुरू झाला आहे. या पार्श्वभूमीवर मान्सूनचा पुढचा प्रवासही सुरळीत पार पडण्याची शक्यता आहे. केरळमधून देशात मान्सून दाखल होण्याच्या आधी वातावरणात बदल नोंदवला जातो. कोरड्या आणि उष्ण वातावरणानंतर पावसाळी वातावरण जाणवू लागते. १ जूनला मान्सून दाखल होईल, असा अंदाज वर्तवताना यामध्ये मान्सून आगमनाच्या तारखेच्या



पुढे- मागे सात दिवसांचा कालावधी गृहीत धरला जातो. गेल्या पाच वर्षांमध्ये दोनवेळा मान्सून १ जूनच्या आधी केरळमध्ये दाखल झाला होता. २०२४मध्ये ३० मे तर २०२२ मध्ये २९ मे रोजी मान्सून केरळमध्ये धडकला. २०२२मध्ये २७ मे रोजी मान्सून दाखल होईल, असा अंदाज वर्तवण्यात आला होता तर, २०२४मध्ये ३१मेरोजी मान्सून दाखल होण्याचा अंदाज होता. केरळमध्ये मान्सून दाखल होण्याचा अंदाज भारतीय हवामान विभाग२००५ पासून वर्तवण्यात येत आहे.

मान्सून दाखल होण्याचा अंदाज वर्तवण्यासाठी सहा निकष मानले जातात. यामध्ये वायव्य भारतातील किमान तापमान, दक्षिण द्वीपकल्पामध्ये मान्सूनपूर्व काळामध्ये पडणारा पाऊस, इंडोनेशियावरील वरच्या थरातील उष्णकटिबंधीय क्षेत्रीय वारा, ईशान्य हिंदी महासागरावरील खालच्या थरातील उष्णकटिबंधीय क्षेत्रीय वारा, दक्षिण चीन समुद्रावरील थर्मल रेडिएशन, उष्णकटिबंधीय वायव्य प्रशांत महासागरावरील समुद्रसपाटीचा सरासरी दाब हे घटक लक्षात घेऊन अंदाज वर्तवला जातो.

'यंदाचा २७ मेचा अंदाज हा या तारखेच्या पुढे-मागे चार दिवस या कालावधीमध्ये मान्सून आगमनाचा समजला जाईल. म्हणजे २३ ते ३१ मे या कालावधीत यंदा मान्सूनचे आगमन अपेक्षित आहे. केरळमध्ये मान्सून दाखल झाल्यानंतर महाराष्ट्रासंदर्भातील अंदाज वर्तवण्यात येईल. मुंबईत १० जूनला व सह्याद्री ओलांडून महाराष्ट्राच्या अंतर्गत भागात १५ जूनला मान्सून अपेक्षित असला तरी अरबी समुद्रात पश्चिम किनारपट्टी समांतर मुंबईकडे येणाऱ्या मान्सूनच्या प्रवाहात बळकपणा किती आहे, हे पाहूनच महाराष्ट्रात मान्सून जूनच्या कोणत्या तारखेला प्रवेश करील, हे सांगता येईल,' असे निवृत्त हवामान अधिकारी माणिकराव खुळे यांनी सांगितले. मान्सून आगमनापूर्वी मान्सूनपूर्व सरींचीही महाराष्ट्रामध्ये अपेक्षा आहे. मध्य महाराष्ट्राच्या काही जिल्ह्यांमध्ये तसेच मराठवाडा, विदर्भ येथे १४ मेपर्यंत अवकाळी पाऊस पडू शकतो. त्यामुळे या विभागांमध्ये कमाल तापमानाचा पारा सरासरीपेक्षा खूप चढा राहणार नाही, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. त्यामुळे महाराष्ट्रासाठी उर्वरित मे महिना तुलनेने कमी तापदायक ठरेल अशीही शक्यता आहे

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# पालखी मार्गावरील अपुर्ण कामे तातडीने पुर्ण करावीत : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

## यात्रा कालावधीत वारकरी भाविकांच्या आवश्यक सर्व सोयी-सुविधेला प्राधान्य द्यावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/ पंढरपूर : आषाढी शुद्ध एकादशी सोहळा ०६ जुलै २०२५ रोजी होणार असून, या सोहळ्यासाठी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचे ३० जून तर जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याचे ०१ जुलै २०२५ रोजी सोलापूर जिल्ह्यात आगमन होणार आहे. या पालखी सोहळ्याबरोबर तसेच अन्य संताच्या पालखी सोहळ्यासोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. या सर्व वारकरी भाविकांना पालखी मार्ग, विसावा तसेच पालखी तळांवर आवश्यक असलेल्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यास प्राधान्य द्यावे तसेच पालखी मार्गावरील अपुर्ण कामे तातडीने पुर्ण करावीत अशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिल्या.

आषाढी यात्रेच्या पुर्वतयारीबाबत श्री विठ्ठल-रुक्मिणी भक्त निवास, पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम, प्रांताधिकारी सचिन इथापे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, कार्यकारी अभियंता अमित निमकर, मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री, पोलीस निरिक्षक विश्वजीत घोडके आदी उपस्थित होते.

**पालखी मार्ग, तळांवर शौचालय, हिरकणी कक्ष, चेजिंग रुमची संख्या वाढवावी**

यावेळी जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पालखी मार्गावरील अपुर्ण कामे तातडीने पुर्ण करावीत तसेच पालखी मार्गावरुन पालखी तळांकडे जाणाऱ्या रस्त्यांची वारीपूर्वी दुरूस्ती करावी. भंडीशेगांव येथील जलसंपदा विभागाच्या जागेत मोडकळीस आलेल्या इमारती असून त्या इमारती पाडण्यासाठी पाटबंधारे विभाग व बांधकाम विभागाने आवश्यक ती कार्यवाही तत्काळ करावी. पालखी मार्ग व पालखी तळांवर शौचालय, हिरकणी कक्ष, चेजींग रुम यांची संख्या वाढवावी. पिराच्या कुरोली येथील रस्ता रुंदीकरणाच्या कामांबाबत तात्काळ प्रस्ताव सादर करावा. आषाढी यात्रा कालावधीत एस.टी महामंडाळाकडून तात्पुरते बसस्थानक उभारण्यात येतात त्या ठिकाणी प्रवाशांसाठी मुबलक प्रमाणात शौचालय, स्नानगृहाची व्यवस्था करावी तसेच बसस्थानक स्वच्छ राहील याची दक्षता घ्यावी. तसेच आषाढी यात्रेच्या अनुषंगाने वारकरी भाविकांना सोयी-सुविधा देण्यासाठी आवश्यक निविदा प्रक्रिया प्राधान्याने पुर्ण कराव्यात अशा सूचनाही जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी यावेळी दिल्या.



तसेच पालखी सोहळा प्रमुखांनी पालखी मार्गावर व पालखी तळांवर सोहळ्यासह भाविकांच्या सोयी-सुविधेसाठी काही सुचना मांडल्या होत्या त्या सुचनांची दखल घेवून तातडीने कामे पुर्ण करावीत असेही जिल्हाधिकारी आशिर्वाद यांनी यावेळी सांगितले.

# विदर्भ, उत्तर महाराष्ट्रातील खारपाण पट्ट्याला ५.७८ लाख एकर सिंचन लाभ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**तापी मेगा रिचार्ज प्रकल्पाबाबत महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशात ऐतिहासिक करार**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भोपाळ : तापी मेगा रिचार्ज प्रकल्पाबाबत महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश या दोन राज्यांमध्ये एका ऐतिहासिक करारावर स्वाक्षरी करण्यात आली. सुमारे १९,२४४ कोटींच्या या करारामुळे विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील खारपाण पट्ट्याला मोठा लाभ मिळणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज भोपाळ येथे दिली.

सिंचन आणि जलविद्युत प्रकल्पांबाबत महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश आंतरराज्य नियंत्रण मंडळाची बैठक आज भोपाळ येथे झाली. या बैठकीला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव, दोन्ही राज्यांचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, तुलसीराम सिलावट, कुंवर विजय शाह आणि दोन्ही राज्यांचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांना याबाबत माहिती दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आजचा दिवस हा महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशसाठी ऐतिहासिक आहे. तापी मेगा रिचार्ज प्रकल्पाचा आम्ही पूर्वीच संकल्प केला होता. आज त्यावर दोन्ही राज्यांनी सहमती केली आणि त्यासाठी सामंजस्य करार झाला. यापूर्वी ही बैठक २००० मध्ये बैठक झाली होती, त्यानंतर २०२५ मध्ये ही बैठक झाली. परंतू या प्रकल्पाबाबत दोन्ही राज्य परस्परांच्या संपर्कात होते. केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार आल्यानंतर त्यांनी आंतरराज्य जलकरारांना गती देण्यास सांगितले आणि २०१६ पासून आम्ही याला गती दिली. तापी मेगा रिचार्ज हे जगातील एक आश्चर्य आहे. या प्रकल्पामुळे महाराष्ट्राला २,३४,७०६ हेक्टरला सिंचनलाभ होईल, तर मध्यप्रदेशला १,२३,०८२ हेक्टर सिंचनलाभ मिळेल.



महाराष्ट्रात जिथे खारपाणपट्टा आहे आणि त्यामुळे पिण्याच्या पाण्याच्या आणि सिंचनाच्या समस्या आहेत, तेथे मोठा लाभ या प्रकल्पामुळे होणार आहे. यात जळगाव, अकोला, अमरावती, बुलढाणा या पट्ट्यात मोठा दिलासा मिळेल. शेतकर्यांच्या जीवनात मोठी क्रांती होईल आणि अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळेल. केंद्रीय योजना म्हणून याचा स्वीकार व्हावा, अशी विनंती आता आम्ही दोन्ही मुख्यमंत्री मिळून केंद्र सरकारकडे पुन्हा करणार आहोत.

या बैठकीत महाराष्ट्राचे मुद्दे सुद्धा आम्ही मांडले. त्यात डांगुर्ली बॅरेज, जामघाट असे महत्त्वाचे मुद्दे होते. या जामघाट प्रकल्पासाठी २८ वर्षांपूर्वी मी मध्यप्रदेशात तत्कालिन मुख्यमंत्र्यांसोबत आलो होतो. पण, आता त्यालाही गती मिळते आहे, याचा आनंद आहे. या जामघाटमुळे नागपूर शहरासाठी पुढच्या ३०-४० वर्षांसाठी पाणी मिळणार आहे. आता ऑक्टोबरमध्ये पुढची बैठक घेण्यात येईल. महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश कोणत्या क्षेत्रात एकत्रित काम करु शकते, यादृष्टीने सुद्धा अनेक बाबींवर यावेळी चर्चा झाली, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली.

असा आहे तापी मेगा रिचार्ज प्रकल्प

- तापी नदीवर मध्यप्रदेशातील खरिया गुटी घाट येथे धरण
- एकूण सिंचनाला लाभ : ३,५७,७८८ हेक्टर
- महाराष्ट्राला लाभ : २,३४,७०६ हेक्टर (जळगाव, अकोला, बुलढाणा, अमरावती) (म्हणजेच सुमारे ५.७८ लाख एकर)
- मध्यप्रदेशला लाभ : १,२३,०८२ हेक्टर (बुर्हाणपूर, खंडवा)
- एकूण पाणीवापर : ३१.१३ टीएमसी
- महाराष्ट्र : १९.३७ टीएमसी/मध्यप्रदेश : ११.७६ टीएमसी
- योजनेची किंमत : १९,२४४ कोटी (२०२२-२३ ची किंमत)

# आपत्तीग्रस्त नागरिकांना लवकरात लवकर नुकसान भरपाई देण्याची खासदार बाळ्या मामा यांची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

४ एप्रिल व ६ मे रोजी राज्यात अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस व गारपीट झाली होती.ठाणे जिल्ह्यातील भिवंडी, वाडा शहापूर ,मुरबाड, कल्याण तालुक्यामध्ये देखील या नैसर्गिक आपत्तीमुळे नागरिकांच्या मालमत्तासह शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



नैसर्गिक आपत्तीमुळे नागरिकांच्या झालेल्या नुकसानीचे लवकरात लवकर पंचनामे करावे अशी मागणी भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे खासदार बाळ्या मामा यांनी ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली होती. खासदार बाळ्या मामा यांच्या निवेदनाची दखल ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाने घेतले असून नुकसानग्रस्त नागरिकांच्या मालमत्तांचे लवकरात लवकर पंचनामे करून त्यासंदर्भात योग्य ती कारवाई त्वरित करण्यात येईल असे लेखी आश्वासन ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून खासदार बाळ्या मामा यांना देण्यात आले आहे.

# पूर्व वैमानस्यातून चौघांनी केली मारहाण, गुन्हा दाखल

सोलापूर : अक्कलकोट रोड येथील वेलकम फॅशन हॉल येथे झालेल्या भांडणाच्या वादातून चौघांनी मारहाण केल्याची घटना बुधवारी (दि.७) घडली. याप्रकरणी जाकीर हमीद मुल्ला (रा. मु. पो. वळसंग, ता. दक्षिण सोलापूर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून आयुद शेख, सद्दाम शेख, अरबाज शेख, बाबा शेख यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की, यातील फिर्यादीच्या पत्नीचा चुलत भाऊ नुरूद्दीन याचा विवाह झाल्यानंतर ते खरेदीसाठी जात होते. यापूर्वी झालेल्या तक्रारीवरून फिर्यादीस संशयित आरोपी आयुद शेख व सद्दाम शेख यांनी लाकडाने मारून जखमी केले. तसेच संशयित आरोपी अरबाज शेख बाबा शेख यांनी फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्याचबरोबर संशयित आरोपी बाबा शेख यांनी चार चाकी गाडीची काच फोडली असे फिर्यादीत नमूद आहे.

# हातमाग, वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविकेसाठी १० जून पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : केंद्र शासनाच्या भारतीय तंत्रविज्ञान संस्थेतील सन २०२५-२६ या शैक्षणिक सत्राकरिता तीन वर्षीय (सहासत्रीय) हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी इच्छुकांनी १० जून २०२५ पर्यंत विहित नमुन्यातील अर्ज सादर करावेत, असे आवाहन वस्त्रोद्योग आयुक्त संजय दैने यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे केले आहे.

महाराष्ट्रातून हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाकरिता बरगढ (ओडिशा) येथे १३ + १ तसेच वेंकटगिरी येथे २ जागेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे. यासाठी नागपूर, सोलापूर, मुंबई व छत्रपती संभाजीनगर येथील प्रादेशिक उपायुक्त वस्त्रोद्योग कार्यालयांमार्फत १० जून २०२५ पर्यंत विहित नमुन्यात प्रवेश अर्ज मागविण्यात आले आहेत. इच्छुक उमेदवारांनी याबाबतचे परिपूर्ण अर्ज १० जून २०२५ पर्यंत संबंधित प्रादेशिक उपायुक्त वस्त्रोद्योग कार्यालयाकडे सादर करावेत.

उमेदवारांकरिता अधिक माहिती, प्रवेश अर्जाचा नमुना व इतर अनुषंगिक माहिती वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या http.www.dirtexmah.gov.in या संकेतस्थळावर तसेच सर्व प्रादेशिक उपायुक्त, वस्त्रोद्योग यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे, असे वस्त्रोद्योग आयुक्त संजय दैने यांनी कळविले आहे.

**फक्त पीओके नव्हे, पाकिस्तानात घुसून दणका**

**पाच दशकातील मोठी कारवाई; पाच मोठे दहशतवादी ठार**


# धमक्या देणाऱ्या पाकिस्तानचे लोटांगण; दहशतवाद्यांचं कंबरडं मोडलं

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: जम्मू-काश्मीरच्या पहलगामध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २२ जण मारले गेल्यानंतर भारत-पाकिस्तानचे संबंध ताणले गेले. यानंतर भारतानं पाकिस्तान सोबतचे संबंध तोडले. सिंधू जल समझोता रद्द केला. ७ मेच्या रात्री भारतानं ऑपरेशन सिंदूर राबवलं. एअर स्ट्राईक करत दहशतवाद्यांचे ९ तळ उद्धवस्त केले. यानंतर पाकिस्ताननं प्रतिहल्ल्याचा प्रयत्न केला. अखेर ४ दिवसांत पाकिस्तान वठणीवर आला. पाकिस्तानच्या विनंतीनंतर भारतानं शस्त्रसंधीचा निर्णय घेतला. या सगळ्यात भारतानं अनेक गोष्टी साध्य केल्या.

कोणत्याही प्रकारचा दहशतवादी आमच्या भूमीवर सहन केला जाणार नाही, असा संदेश ऑपरेशन सिंदूर राबवत भारतानं दिला. भारतानं पाकिस्तानात घुसून दहशतवादी तळ उडवले. दहशतवादी हल्ले सहन करणार नाही. हल्ले केले तर घुसून मारु, हा संदेश भारतानं स्पष्टपणे दिला.

पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवादी तळ भारतीय सैन्यानं जमीनदोस्त केलं. पीओकेमधील ५, पाकिस्तानातील ४ दहशतवादी तळ नेस्तनाबूत करण्यात आले. यामध्ये जैश-ए-मोहम्मद, लष्कर-ए-तय्यबाच्या मुख्यालयांचा समावेश आहे. पाकिस्तान सरकार पुरस्कृत दहशतवादाचं कंबरडं मोडण्याचं काम भारतानं केलं.



पाकिस्तान, पीओकेमध्ये एअर स्ट्राईक करुन भारतानं अनेक मोठ्या दहशतवाद्यांना यमसदनी धाडलं. त्यांची यादी समोर आलेली आहे. यात जैश-ए-मोहम्मदचा म्होरक्या मसूद अजहरचा भाऊ अब्दुल रौफ अजहर, लष्कर-ए-तय्यबाचा कमांडर अबु जुंदाल, जैशसाठी आर्थिक रसद गोळा करणारा हाफिज मोहम्मद यांचा समावेश आहे. याशिवाय मुदस्सर खादियान खास, हाफिज मोहम्मद जमील, मोहम्मद युसूफ अजहर, खालिद (अबू अकाशा), मोहम्मद हसन खान यांचाही समावेश आहे.

२००१ मधील संसदेवरील हल्ला, २६/११ मुंबईवरील हल्ला, पहलगाम हल्ल्याच्या सूत्रधारांना संपवण्यासाठी ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून दहशतवादी गटांच्या मुख्यालयांना लक्ष्य करण्यात आलं. दहशतवाद्यांना संपवण्यासाठी कोणत्याही पातळीवर जाऊ शकतो, हा संदेश या निमित्तानं भारतानं जगाला दिला.

पाकिस्तानविरोधात धडक कारवाई करत भारतानं आपण एक मजबूत देश असल्याचं जगाला दाखवून दिलं. अण्वस्त्र देशात घुसून एअर स्ट्राईक करणारा पहिला देश म्हणून भारताची नोंद झाली. कोणत्याही देशाची फिकीर न करता भारतानं केलेली कारवाई चर्चेचा विषय ठरली. दहशतवाद खपवून घेणार नाही, हा स्पष्ट संदेश भारतानं जगातील सगळ्या देशांना दिला.

दोन्ही देशांमध्ये तणाव असताना भारतानं पाकिस्तानी सैन्याचे दहशतवाद्यांशी असलेले सुमधूर संबंध जगासमोर आणले. भारताच्या एअर स्ट्राईकमध्ये बडे दहशतवादी मारले गेले. त्यांच्या अंत्यविधीला पाकिस्तानी सैन्याचे अधिकारी, नेते उपस्थित राहिले. त्यांचे फोटो समोर आले. त्यांच्या आधारे भारतानं जगभरात पाकिस्तानचा बुरखा फाडला. भारतानं ७ मेपासूनच पाकिस्तानच्या पोकळ हवाई सुरक्षा यंत्रणेची पोलखोल केली. एअर स्ट्राईक करताना भारतानं पाकिस्तानात १०० किमीपर्यंत क्षेपणास्त्रं डागली. पण पाकिस्तानच्या तकलादू हवाई सुरक्षा यंत्रणेला याचा पत्ताही लागला नाही.

भारताच्या एअर स्ट्राईकनंतर पाकिस्ताननं सलग तीन दिवस भारतावर हवाई हल्ले केले. शेकडो ड्रोन्स डागण्यात आले. क्षेपणास्त्रं सोडण्यात आली. पण भारताच्या एस-४०० हवाई सुरक्षा यंत्रणेनं पाकिस्तानचे सगळे हल्ले हाणून पाडले. भारताची हवाई सुरक्षा यंत्रणा किती मजबूत आहे, याची झलक गेल्या ३ दिवसांत सगळ्या जगानं पाहिली.

१९७१ मध्ये भारत-पाकिस्तान युद्ध झाल्यानंतर गेल्या ५४ वर्षांत भारताच्या तिन्ही दलांनी मिळून कोणतीही संयुक्त कारवाई केली नव्हती. पण ऑपरेशन सिंदूर तिन्ही दलांनी पाच दशकांनंतर सगळ्यात मोठी कारवाई करत पाकिस्तानचं कंबरडं मोडलं.

१९७१ नंतर पहिल्यांदाच भारतानं पाकिस्तानात घुसून कारवाई केली. गेल्या पाच दशकांत भारतानं केलेल्या कारवाया सीमावर्ती भाग, पीओकेपर्यंत मर्यादित होत्या. पण ऑपरेशन सिंदूर राबवताना भारतानं पाकिस्तानी जमिनीवरील दहशतवादी तळ जमीनदोस्त केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### मदरसा व मस्जिदच्या नावे देणगी गोळा करत केली फसवणूक

सोलापूर : एमआयडीसी पोलीस ठाणे परिसरात तक्र्या अरबी मदरसा मस्जिदच्या नावाने विडी घरकुल परिसरात लक्ष्मी चौक येथे ३१ मार्च २०२५ ते आज पर्यंत देणगी गोळा करत असल्याचे दाखवून देणगीदारांची फसवणूक केल्याची घटना घडली. याप्रकरणी नितीन दत्तात्रय जावळे (वय ३८, नेमणूक एटीएस) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून रियाज अहमद जमीर कुमठे (रा. जी ग्रुप विडी घरकुल) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की, यातील संशयित आरोपी रियाज कुमठे यांनी तक्र्या अरबी मदरसा व मस्जिदच्या नावाने विडी घरकुल परिसर लक्ष्मी चौक येथे ३१ मार्च ते आजपर्यंत देणगी गोळा करत असल्याचे दाखवून देणगीदारांची फसवणूक केली. स्वतः मदरसाचा उपाध्यक्ष असून सुद्धा विश्वसतांच्या कर्तव्याचे उल्लंघन करून स्वतःच्या नावावर बँक खात्यावर देणगी वळवून अपहार करून देणगीदारांची फसवणूक केल्याची फिर्यादीत नमूद आहे.

### महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावले

सोलापूर : साई सुपर मार्केट येथे दुचाकीवर जाताना पाठीमागून आलेल्या मोटरसायकलवर तिघा अज्ञात चोरट्याने गळ्यातील ३१ हजार पाचशे रुपये किमतीचे सात ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून पोबरा केल्याची घटना मंगळवारी (दि. ६) घडली. याप्रकरणी सोनाली अमित उंबरजे (वय ४३, रा. शुक्रवार पेठ) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात तीन चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# सोलापूरच्या सिव्हिल हॉस्पिटलमधील गैरसोयींवर खा. प्रणिती शिंदे संतापल्या; रुग्णसेवा सुधारण्यासाठी तातडीच्या उपाययोजनांचे निर्देश

## खासदार प्रणिती शिंदे यांनी शनिवारी अचानक दिली सिव्हिल रुग्णालयाला भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूरच्या पहिल्या महिला खासदार प्रणिती शिंदे यांनी शनिवारी अचानक सिव्हिल रुग्णालयाला भेट देऊन रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना भेडसावणाऱ्या गंभीर समस्यांकडे लक्ष वेधले. रुग्णालयातील अनागोंदी कारभार, रुग्णसेवेतील कमतरता आणि प्रशासकीय ढिसाळपणा पाहून खासदार शिंदे यांनी तीव्र संताप व्यक्त केला. त्यांनी रुग्णालय प्रशासनाला तातडीने सुधारणा करण्याचे निर्देश दिले असून, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी पत्रव्यवहार करून रुग्णांची हेळसांड थांबवण्यासाठी ठोस पावले उचलण्याचे आश्वासन दिले आहे.



प्रणिती शिंदे यांच्या भेटीदरम्यान रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांनी रुग्णालयातील अनेक गैरसोयींचा पाढा वाचला. रुग्णांना तपासणीसाठी स्वतःच्या नातेवाईकांना स्ट्रेचरवर घेऊन जावे लागते, कारण वॉर्ड बॉय उपलब्ध नसतात. केस पेपर काढण्यासाठी दोन-तीन तास रांगेत उभे राहावे लागते, तर बाहेरगावाहून येणाऱ्या रुग्णांना उपचार न मिळता दोन-तीन दिवसांनी परत येण्यास सांगितले जाते. यामुळे रुग्णांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे खासदार शिंदे यांच्या निदर्शनास आले.

**सिटीस्कॅन सुविधेतील त्रुटी**

खासदार प्रणिती शिंदे यांच्या प्रयत्नातून सिविल रुग्णालयाला ८ मार्च २०२५ रोजी कोट्यवधी रुपयांची अत्याधुनिक सिटीस्कॅन मशीन उपलब्ध झाली. मात्र, या सुविधेचा पूर्ण क्षमतेने उपयोग होत नसल्याचे त्यांनी शनिवारी रुग्णालयातील सिटीस्कॅन विभागाला भेट दिल्यावर लक्षात आले. यावेळी रुग्णांनी सांगितले की, सिटीस्कॅनसाठी शुल्क आकारले जाते, परंतु त्याची फिल्म दिली जात नाही; केवळ मोबाइलवर फोटो स्वरूपात पाठवली जाते. तसेच, सिटीस्कॅन युनिटमध्ये केवळ एकाच कर्मचाऱ्याची नियुक्ती आहे, त्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांना स्वतः रुग्णांना सिटीस्कॅन रूमपर्यंत न्यावे लागते. एमआरआय, सिटीस्कॅन आणि एक्स-रे यांचे रिपोर्ट वेळेत मिळत नसल्याच्या तक्रारी समोर आल्या.

रुग्णांनी खासदार शिंदे यांच्याकडे केलेल्या तक्रारींनुसार, येथील रुग्णांना महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजनेतून औषधे दिली जात नाहीत. त्याऐवजी रुग्णांना बाहेरून औषधे खरेदी करण्यास सांगितले जाते. एक्स-रे आणि सोनोग्राफी यांसारख्या सुविधांसाठी रोख रक्कम आकारली जाते, जी ऑनलाइन स्वीकारली जात नाही. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांची वरिष्ठ डॉक्टरांकडून तपासणी केली जात नसल्याचा गंभीर आरोप रुग्णांनी केला. याशिवाय, रुग्णालयातील काही डॉक्टर रुग्णालयाच्या वेळेत खासगी क्लिनिक चालवत असल्याचेही उघड झाले. अशा डॉक्टरांनी सिव्हिल रुग्णालयातील सेवा कालावधीत खाजगी प्रॅक्टिस करू नये असे स्पष्ट मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

> **सिव्हिल रुग्णालयाच्या आवारातील ए-ब्लॉकसमोरील बगीच्याच्या मोकळ्या जागेवर प्रशासनाने इमारत बांधण्याचे नियोजन केले आहे. या बगीच्याचा उपयोग रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक विश्रांतीसाठी करतात. या प्रस्तावित बांधकामाला रुग्ण, नातेवाईक आणि सामाजिक संघटनांनी तीव्र विरोध केला आहे. खासदार शिंदे यांनी या मुद्द्याची गंभीर दखल घेत बांधकामाला तात्पुरती स्थगिती देण्याचे आश्वासन दिले आहे. त्यांनी रुग्ण आणि नातेवाईकांसाठी मोकळी जागा उपलब्ध राहावी, यासाठी प्रशासनाशी चर्चा करणार असल्याचे स्पष्ट केले.**

**खासदार शिंदे यांचा आक्रमक पवित्रा**

खासदार प्रणिती शिंदे यांनी रुग्णालयातील या गंभीर त्रुटींकडे तातडीने लक्ष वेधत प्रशासनाला खडसावले. त्यांनी रुग्णालयाचे अधिष्ठाता यांच्याकडे या सर्व तक्रारींची चौकशी करण्याची मागणी केली आहे. तसेच, रुग्णसेवा सुधारण्यासाठी आणि प्रशासकीय ढिसाळपणा थांबवण्यासाठी राज्य सरकारकडे पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. रुग्णांची हेळसांड खपवून घेतली जाणार नाही. सिव्हिल रुग्णालय हे सर्वसामान्यांसाठी आहे, आणि त्यांना दर्जेदार सेवा मिळणे हा त्यांचा हक्क आहे, असे शिंदे यांनी ठणकावले.

या भेटीने सोलापूरच्या सिव्हिल रुग्णालयातील विदारक वास्तव समोर आले आहे. खासदार प्रणिती शिंदे यांनी या समस्यांचे निराकरण करण्यासाठी कठोर पावले उचलण्याचे आश्वासन दिले आहे. रुग्णांना तातडीने उपचार मिळावेत, औषधांचा पुरवठा नियमित व्हावा, आणि प्रशासकीय सुधारणा व्हाव्यात, यासाठी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना यामध्ये लक्ष घालण्या बाबतच्या सूचना करणार असल्याचे आश्वासन दिले आहे. तसेच, रुग्णालयातील कर्मचारीवर्ग वाढवणे, सिटीस्कॅन आणि इतर सुविधांसाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करणे, आणि रोख शुल्क आकारणीवर नियंत्रण आणण्यासाठी जिल्हाधिकारी आणि राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याशी पत्रव्यवहार करणारा असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

खासदार शिंदे यांनी सिव्हिल रुग्णालयातील सुधारणांसाठी एक व्यापक आराखडा तयार करण्याचे नियोजन केले आहे. यामध्ये रुग्णसेवेची गुणवत्ता वाढवणे, प्रशासकीय पारदर्शकता आणणे आणि रुग्णालयाच्या आवारातील मोकळ्या जागांचे संरक्षण करणे यांचा समावेश आहे. तसेच, रुग्णालयातील डॉक्टरांच्या खासगी प्रॅक्टिसवर निर्बंध घालण्यासाठीही त्यांनी पावले उचलण्याचे ठरवले आहे.

सोलापूरच्या सिव्हिल रुग्णालयातील या समस्यांकडे खासदार प्रणिती शिंदे यांनी वेधलेले लक्ष आणि त्यांनी घेतलेला आक्रमक पवित्रा यामुळे रुग्णसेवेत सकारात्मक बदल घडण्याची अपेक्षा आहे. त्यांच्या या प्रयत्नांमुळे सोलापूरकरांना दर्जेदार आरोग्य सुविधा मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# २७ वर्षानंतर माजी विद्यार्थी एकत्र येऊन पुन्हा भरवली स्नेहाची शाळा

## माजी विद्यार्थ्यांकडून एक लाख रुपये किंमतीचे विद्यालयाचे डिजिटल नाम फलक दिले सप्रेम भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा /प्रतिनिधी : कसगी ता उमरगा येथील श्री सिद्धेश्वर शिक्षण संस्था संचालित, सिद्धेश्वर विद्यालय कसगी येथे सन १९९७-१९९८ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा उत्साहात संपन्न झाले.




अत्यंत भारदस्त आणि उत्तम नियोजनाची माजी विद्यार्थ्यांच्या कामाची प्रचिती या स्नेह मेळाव्यानिमित्त घडले.

विद्यालय आणि गुरुजनांची कृतज्ञता म्हणून, मागील २७ वर्षांपूर्वीचा आठवणीचा उजाळा म्हणून सर्व विद्यार्थी एकत्रित येऊन स्नेह मेळावा आयोजित केला होता.

ही बॅच अत्यंत यशस्वी बॅच म्हणून ओळख असून, सर्व विद्यार्थी एकत्रित येऊन विद्यालयाचे मुख्य प्रवेशद्वाराचे एक लाख रुपये किमतीचे डिजिटल नाम फलक तयार करून शाळेला भेट दिली. तसेच विद्यालयातील इयत्ता पाचवी ते दहावी गरीब व गुणवंत विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन प्रोत्साहन देण्यात आले.

प्रारंभी विद्येची देवता सरस्वती आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक श्रीरंग माने, संस्थेचे अध्यक्ष विठ्ठलराव पटणे सचिव विठ्ठलराव बदोले उपाध्यक्ष विजयसिंह राजपूत मुख्याध्यापक राजा माशाळे माजी मुख्याध्यापक अमृत पाटील, एस आर माशाळकर, मुगळे गुरुजी, बसवराज हिरेमठ,मा. परिवेक्षक वसंत नंदर्गे सहशिक्षक शशिकांत चनपटणे, सखाराम यमगर, सुभान चव्हाण कार्यालयीन अधीक्षक मल्लिकार्जुन कलशेट्टी आजी-माजी विद्यार्थी शिक्षक पुरंदर उपस्थित होते.

दोन महिन्यापासून जयत तयारी या स्नेह मेळाव्याचा करण्यात आला होता.

विद्यालयाचा माजी विद्यार्थी मनोज स्वन्नद, संजय जगताप, ईश्वर मुगळे, यांनी पुढाकार घेऊन कार्यक्रमाचे यशस्वी पुढाकार घेतला होता. व इतर सर्व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून. मागील २७ वर्षांपूर्वीच्या शाळेतील आठवणी पुन्हा उजाळा देण्यात आले.

श्री सिद्धेश्वर विद्यालयाने विद्यार्थी दशेत आम्हाला शिकण्यासाठी खूप काही दिले आम्हाला घडवले अशी कृतज्ञता माजी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगत आतून व्यक्त केले.

या विद्यालयाने आम्हाला उत्तम विद्यार्थी म्हणून घडवलेच आहे. त्याचबरोबर संस्कार चम्या आदर्श व्यक्तिमत्व सुद्धा आम्हाला घडवलं आहे असेही यावेळी आपल्या मनोगततून व्यक्त केले.


कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोपात संस्थेचे सचिव श्री विठ्ठलराव बदोले यांनी माजी विद्यार्थ्यांचा हा उत्साह आणि कृतज्ञता पाहून, सर्व विद्यार्थ्यांचे आभार व्यक्त केले आणि त्यांच्या भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय जगताप आणि शुभांगी कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आजी-माजी विद्यार्थी आणि गुरुजन यांनी केले.

# पंढरपूर नगरपरिषदेचा आरोग्य कर आणि पार्किंग वसुलीचा ठेका रद्द

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी

पंढरपूर नगरपालिकेच्या वतीने आरोग्य व्यवस्था कर व पार्किंग कर वसुलीचा ठेका रद्द करण्यात करण्यात आल्याची माहिती पालिकेची उपमुख्य अधिकारी अँड सुनील वाळूजकर यांनी दिला. यासंदर्भात माहिती नगरपालिके केने यासाठी पालिकेच्या वतीने समाज माध्यमाच्या वतीने देखील हेच पत्र प्रतिनिधी दिले आहे.



याबाबत माहिती देताना पालिकेचे उपमुख्य अधिकारी वाळुंजकर यांनी सांगितले की पंढरपूर शहरातील आरोग्य व्यवस्था कर व पार्किंग कर वसुली करिता निर्मला ऑटो केअर सेंटर अहमदनगर या कंपनीला ठेका देण्यात आलेला होता. मात्र ५ मे २०२५ रोजी संध्याकाळी शहरातील गजानन महाराज मठ भागातील रस्त्यावर कंपनीमार्फत नियुक्त कर्मचारी यांच्या कडून नाशिक भाविक पंढरपूर मध्ये दर्शनासाठी आलेले असताना त्या भाविकांशी गैरवर्तन केल्याची फेसबुक लाईव्ह व्हिडिओ प्रसारित करण्यात आला होता. याची गांभीर्याने दखल घेऊन नगरपरिषदेने निर्मला ऑटो केअर सेंटर अहमदनगर यांचा आरोग्य व्यवस्था कर व पार्किंग कर वसुलीचा ठेक आठ मे पासून रद्द करण्यात आला आहे.

> **यापुढे ऑरगेकर व पार्किंग कर देऊ नये**
>
> **पंढरपूर झाल्यानंतर यापुढे कोणत्याही कोणत्याही व्यक्तीस आरोग्य कर व पार्किंग कर देऊ नये तसे निदर्शनास आल्यास त्वरित नगर परिषदेत ही संपर्क साधावा असे देखील आव्हान नगरपालिकेच्या वतीने उपमुख्य अधिकारी अँड सुनील वाळुस्कर यांनी केलेले आहे.**

## ४५ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल पंढरपुरात जप्त

# पंढरपूर तालुका पोलिसांची वाळूमाफियाविरुद्ध मोठी कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर तालुका पोलिसांची वाळू तस्कर विरुद्धची मोहीम सुरूच असून कारवाया होत आहेत शुक्रवारी पहाटे तालुका पोलिसांनी पुन्हा मोठी कारवाई केली असून यामध्ये चार औरंगपूर गुन्हा दाखल करण्यात आला आहे लाखो रुपयांचा मुद्दामाल जप्त करण्यात आला आहे



शुक्रवार दिनांक ९ मे रोजी पहाटे एक वाजण्याच्या सुमारास उपविभागीय पोलीस अधिकारी भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले पीएसआय विजू गायकवाड पोलीस कॉन्स्टेबल मंगेश रोकडे पोलीस कॉन्स्टेबल रामकृष्ण खेडकर यांच्या पथकाने गोपनीय मिळालेल्या माहितीच्या आधारे ओझेवाडी येथील नदीपात्रातून अवैध वाळू उपसा करताना एक लोखंडी टिपर तसेच एक जेसीबी व चार ब्रास वाळू एकूण किंमत ४५ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे

सदरची कारवाई माननीय पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले पीएसआय विजय गायकवाड पोलीस हेडकॉन्स्टेबल मंगेश रोकडे पोलीस कॉन्स्टेबल रामकृष्ण खेडकर यांच्या पथकाने केली आहे पुढील तपास तालुका पोलीस स्टेशन करीत आहे.

> **सदर अवैद्य वाळू चोरी प्रकरणी आरोपी मंगेश बाबुराव जाधव राहणार सिद्धेवाडी आणि विजय लहू भोसले राहणार पुळुज जेसीपी टिपर चालक अशा चार जनाविरुद्ध पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

# युवकांनी परमार्थाकडे वळावे : ह. भ. प. विठ्ठल महाराज दिंडेगावकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : लोहारा तालुक्यातील करवंजी येथे चालू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यातील चवथ्या दिवशी शुक्रवारी (दि. ०९)रोजी ह भ प गुरुवर्य विठ्ठल महाराज दिंडेगावकर किर्तन सेवेत बोलत होते.



**आपुलिया हिता जो असे जागता । धन्य माता पिता तयाचिया ।।१।।**
**कुळीं कन्यापुत्र होतीं जीं सात्त्विक । तयांचा हरिख वाटे देवा ।।२।।**
**गीता भागवत करिती श्रवण । आणीक चिंतन विठोबाचें ।।३।।**
**तुका म्हणे मज घडो त्यांची सेवा । तरी माझ्या दैवा पार नाहीं ।।४।।**

या अभंगावर चिंतन केले,

सन्मार्गाने चालत असताना स्वहित साधण्याकरीता जो मनुष्य सतत प्रयत्न करीत राहतो त्यास तुकोबा माउली जागता म्हणजेच जागरूक मनुष्य अशी उपाधी देतात. स्वतःचा प्रापंचिक व पारमार्थिक उत्कर्ष करून घेणाऱ्या अशा मनुष्याचे माता पितादेखील अशा अपत्यांस जन्म देऊन जन्म सार्थकी झाला ह्या हेतूने कृतकृत्य होतात. असे सात्विक कन्या-पुत्र ज्या कुळामध्ये जन्म घेतात तेव्हा प्रत्यक्ष त्या श्रीहरीला देखील आनंद होतो. साहजिकच अशा सत्पुरुषांच्या घरी विठोबाचे चिंतन करीत गीता,भागवताचे श्रवण,मनन देखील होत असते. म्हणूनच शेवटच्या दोन ओव्यांमध्ये तुकोबाराय विठू माऊलीकडे अशा सदाचारी सद्गृहस्थांची सेवा घडावी म्हणून प्रार्थना करतात. आणि आपल्या दैवाबद्दल कृतज्ञता व्यक्त करतात.

मनुष्य जन्म हा वाया घालवण्याचा अधिकार कोणालाच नसून तो सार्थकी लागावा यासाठी नामस्मरण ही साधना सर्वांनी केली पाहिजे, प्रपंचाची उठा ठेव करण्याच्या नादात भक्ती पासून दूर जाऊ नका.आणि जन्म मरणाच्या फेऱ्यात फिरू नका. भक्ती करण्यासाठी भगवंताविषयी एक निष्ठावंत भावच असला पाहिजे असे महाराज म्हणाले..

युवकांनी परमार्थ करायला पाहिजे, मुखात विठ्ठलाचे नाव पाहिजे, आपण कुठे का असना विठ्ठलाचे भजन करावे असे दिंडेगावकर महाराज सांगितले.

यावेळी व्यासपीठाधिकारी कमलाकर बेडगे महाराज , नवनाथ शिंदे महाराज आदी मान्यवर उपस्थित होते. गावातील व परिसरातील सुपतगाव तोरंबा ,कोराळ,हिप्परगा, हराळी भजनी मंडळ भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संकटाच्या काळात देश सेवेसाठी; सैनिक टाकळीतील माजी सैनिकांची तयारी

## मॉकड्रिल, ब्लॅकआऊट इत्यादी सर्वच बाबतीत समग्र आढावा बैठकीत दिले दिशानिर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारत आणि पाकिस्तान मधील वाढत्या तनावाच्या पार्श्वभूमीवर येथील अनेक माजी लष्करी कर्मचाऱ्यांनी सैन्यात पुन्हा सामील होण्याची आणि गरज पडल्यास देश सेवा करण्याची तयारी दर्शवले आहे. पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर देण्याचा अधिकार भारताने बजावला आहे. भारताने ऑपरेशन सिंदूर च्या माध्यमातून पाकिस्तानमधील दहशतवाद्यांच्या अड्डे उध्वस्त केले आहेत. सैनिकी परंपरा असलेल्या या गावातील माझी जवानांनी या कारवाईत सामील होण्याची तयारी दर्शवली आहे. सशस्त्र दलात पूर्वी सेवा केलेले हे माजी सैनिक त्यांच्या देशा प्राप्ती कर्तव्य आणि निष्ठेचे व्यक्त करत आहेत.



माझी लष्करी जवान देशभक्तीच्या भावनेने आणि त्यांच्या राष्ट्राचे रक्षण करण्याच्या इच्छेने प्रेरित असून त्यांच्या सेवेदरम्यान मिळालेले मौल्यवान अनुभव आणि कौशल्याच्या संकटाच्या काळात युद्धात फायदा होईल असे त्यांना वाटते माजी सैनिक त्यांच्या अनुभवाच्या आधारे धोरणात्मक अंत्यदृष्टी आणि मार्गदर्शन देऊ शकतात तसेच नवीन भरती झालेला ना प्रशिक्षण आणि मार्गदर्शन करण्यात मदत करू शकतात तसेच ऑपरेशनल प्लॅनिंग आणि अंमलबजावणी मध्ये योगदान देण्याची तयारी दर्शविली आहे.

कॅप्टन प्रकाश तुकाराम खोत (सेवानिवृत्त) १९ मराठा बटालियन (कोल्हापूर) मी सैनिक टाकळी गावचा रहिवाशी असून माझे वडील स्व. तुकाराम दत्तू खोत हे सुद्धा 02 para regiment मध्ये २८ वर्षे सर्विस केली. त्यामध्ये त्यांनी १९६५ आणि १९७१ च्या लढाईमध्ये सहभागी होते व जखमी झालेले. सध्या ते नाहीत. माझं सैनिकी परंपरेचं गाव देशाच्या रक्षण करण्यासाठी पहिल्या महायुद्धापासून ते आत्तापर्यंत १८ जवान देशाचे संरक्षण करण्यासाठी शहीद झालेले आहेत. माझं शालेय शिक्षण मिलिटरी हॉस्टेल बेळगाव मध्ये पूर्ण झालं. बेळगाव मध्ये सैनिकी वातावरण पाहून मला मिलिटरी मध्ये जाण्याची मनापासून इच्छा होती. तिच्या २६ जून १९९३ रोजी भारतीय सेनेमध्ये रुजू झालो. ट्रेनिंग नऊ महिने व्यवस्थित रित्या पूर्ण झाली. त्यामध्ये मला उत्तम शिपाई चे मेडल मिळाले. लहानपणापासूनच गावासाठी आणि देशासाठी काहीतरी करून दाखवायचं मनात दृढ इच्छा होती. ट्रेनिंग करून युनिटमध्ये गेल्यानंतर माझी बॉक्सिंग गेम साठी निवड झाली. त्या खेळामध्ये मी सदन कमांड पर्यंत फाईट खेळल्या. त्यानंतर मी बटालियनमध्ये घातक श्रिंप मध्ये कार्यरत राहिलो. हवालदार रँक मध्ये आणि वयाच्या तिसाव्या(30 yrs) वर्षी माझा इंडियन आर्मी मधला पहिला घातक कोर्स (I) ग्रेडिंग प्राप्त करून पूर्ण केला. त्यानंतर श्रिंप कमांडर कोर्स, एन. बी. सी. कोर्स, ज्युनियर लीडरशिप कोर्स याबरोबरच घातक कॉम्पिटिशन करत राहिलो. जमिनीमध्ये सुरंग लावण्याच्या स्पर्धेमध्ये सुद्धा आम्ही पहिला नंबर काढला. दोन वेळा विदेश सेवा करण्याचा योग झाला. पहिला भूटान आणि दुसरा देश साउथ सुडान मध्ये शांतीसैनिक म्हणून कार्यरत होतो. आतंकवादी यांच्याबरोबर लढण्यासाठी दोन वर्ष राष्ट्रीय रायफल मध्ये सुद्धा होतो. लीडरशिप प्रशिक्षक म्हणून बरेली (उत्तर प्रदेश) मध्ये चार वर्षे कार्यरत होतो. याबरोबरच बेळगाव सेंटर येथे एक वर्ष लीडरशिप प्रशिक्षक म्हणून कार्य केले. सेवानिवृत्तीच्या पहिलं दोन वर्ष सियाचीन ग्लेशर येथे कार्यरत होतो एक वर्ष खडतर ट्रेनिंग करून सियाचिन ग्लेशियर पोस्ट मध्ये राहून सेवा बजावली. शेवटचे एक वर्ष गलवान घाटी मध्ये चीनच्या सैनिका समोर लढाईसाठी तैनात होतो. परंतु लढाई झाली नाही. तिथून सेवानिवृत्त झालो. थोडक्यात सांगायचं म्हणजे आतंकवादी यांच्यासोबत बऱ्याच क्षणी मुठभेड झाली परंतु २८ वर्षाच्या कारकीर्दीमध्ये अमोर समोरची लढाई झाली नाही. तरी आत्ता अशी स्थिती झाली तर मी स्वतः फायटिंग ट्रूप्स ला लीड करून लढाई करण्यासाठी तयार आहे.

राष्ट्र आहे तर आपण सर्व जण आहोत. राष्ट्र नाही तर काहीच नाही.

### पाकड्यांना पळवून लावलं



कारगिल येथे युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. तेव्हा माझी पोस्टिंग कारगिल या ठिकाणी झाले होते. यावेळी ड्युटी राशन, दारुगोळा पोहोचवण्याची जबाबदारी माझ्याकडे होती. यावेळी सैन्यांना राशन आणि दारुगोळा पोहोचवण्यासाठी जात असताना आमच्या गाडीवर फायरिंग झाले तोफे चे गोळे येऊ लागले पाकिस्तानी सैनिक फायरिंग करून कब्जा करण्याचा प्रयत्न करत होते. यादरम्यान आम्हाला पुढे जाता येत नव्हते, रात्रीच्या वेळी गाडीचे लाईट बंद करून गाड्या नेल्या, अनेक अडचणींना सामना करीत आम्ही सैन्यांना दारुगोळा पोहोचवला, जीवाची परवा न करता देशाच्या रक्षणासाठी आम्ही झटलो व पाकिस्तान घ्या सैन्यांना पळता भुई थोडी केली सुहास अण्णासाहेब जाधव माजी सैनिक.



ऑननरी नायब सुभेदार बी. डी. पाटील यांनी भारतीय सेनेच्या गुप्तचर विभागामध्ये २६ वर्षे देश सेवा करून रिटायर्ड झालेले आहेत. सैनिकी परंपरा असलेल्या सैनिक टाकळी आणि स्वतः त्यांच्या तीन पिढी सैन्यामध्ये कार्यरत असलेल्या कुटुंबामध्ये यांचा जन्म झालेला आहे. या महत्वाच्या विभागामध्ये असल्यामुळे त्यांनी कारगिल युद्धाच्या वेळी ओपी पराक्रम सारख्या सैन्य अभियान व देश विरोधी आतंकवादी घटना या परिस्थितीत प्रत्यक्ष कार्य केलेल आहे त्यांच्या आर्मी मधील उत्कृष्ट कामाबद्दल सरकारने त्यांना प्रशंसा पत्र सुद्धा दिलेले आहे. पूर्ण सैनिकी वारसा असलेल्या या जवानाचे म्हणणे आहे की पाकिस्तानला जर कायमचा धडा शिकवायचा असेल आणि या युद्धजन परिस्थितीत आमच्यासारख्या सैनिकांची जर देशाला गरज भासत असेल तर ते मातृभूमीच्या रक्षणासाठी लढण्यासाठी सदैव तयार आहेत. यांचा पुतण्या सुभेदार विनायक पाटील हा सुद्धा मातृभूमीच्या रक्षणासाठी चीन सीमेवरती येथे कार्यरत आहे. यांच्या कुटुंबाने आज तागायत नऊ जवान मातृभूमीच्या रक्षणासाठी दिलेले आहेत. यांच्या कुटुंबामध्ये लहान मुले सोडली तर सर्व आर्मी जवान होते आणि आहेत. मातृभूमीसाठी रक्षणासाठी त्याग केलेल्या या कुटुंबाचा तुम्हा सर्वांना गर्व आहे.



हवालदार दीपक बाळासाहेब पाटील हे मराठा लाईट इन्फंट्री बटालियनचे सैनिक आहेत. तीन पिढीचा वारसा असलेल्या या सैनिकाच्या परिवारामध्ये त्यांचे वडील बाळासाहेब पाटील सेवानिवृत्त सैनिक आहेत व त्यांचा लहान भाऊ सुभेदार विनायक पाटील आता सध्या चीनच्या सीमेवरती भारत भूमीच्या संरक्षणासाठी तैनात आहेत. सैनिक सेवेमध्ये असताना त्यांनी भारताच्या सर्व युद्धजन भागामध्ये सर्विस केली आहे त्यामध्ये जम्मू-काश्मीर, नागालँड, मणिपूर व अरुणाचल प्रदेश व तसेच साऊथ आफ्रिका मध्ये वर्ल्डच्या शांती सेनेमध्ये सुद्धा त्यांनी भाग घेतला होता. युद्धात लागणाऱ्या ८१ MM मोटार या सारख्या घातक हत्यार चालवण्याचा त्यांना अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. त्यांची ५ मराठा बटालियन आज पर्यंत झालेल्या सर्व युद्धामध्ये अग्रेसर अशी बटालियन आहे आणि त्या बटालियन बरोबर काम करताना त्या बटालियन मधील युद्ध व शांतिकाळ मधील कार्याचा अनुभव या जवानाच्या पाठीशी आहे. आता भारत पाक युद्ध चालू आहे आणि जर या युद्धामध्ये माजी सैनिकाची जर जरुरत भासत असेल तर ते परत एकदा मातृभूमीच्या रक्षणासाठी सेवा करण्यास तयार आहेत.

## थोडक्यात...

### गर्दीचा फायदा घेत सोन्याची चैन पळविली

सोलापूर : नागुनारायणवाडी येथील सुभद्राबाई मंगल कार्यालय येथे लग्नकार्यात गळ्यातील चाळीस हजार रुपये किमतीची एक तोळे वजनाची सोन्याची चैन अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना गुरुवारी (दि. ८) दुपारी दीड वाजता घडली. याप्रकरणी आकाश श्रीनिवास बंगाळे (वय ३६, रा. रेल्वे लाईन, फॉरेस्ट) याने सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्याच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

### हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी पळवली

सोलापूर : तळे हिप्परगा येथील संभाजीनगर येथे घरासमोर हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी (क्रमांक एम एच १३ ई ई ०३९०) ही चोरून नेल्याची घटना २७ एप्रिलला घडली. याप्रकरणी किरण संभाजी भोकरे (वय ३८ रा. संभाजीनगर, तळे हिप्परगा) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

## वरिष्ठ पत्रकार महेश गायकवाड यांना राज्यस्तरीय आद्य पत्रकार दर्पणकर आचार्य बाळशास्त्री जांभेकर आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : १११ सुवर्ण रत्नांचा सन्मान सोहळा मधील राज्यस्तरीय आद्य पत्रकार दर्पणकर आचार्य बाळशास्त्री जांभेकर आदर्श पत्रकार पुरस्कार सोलापूर जिल्ह्यातील वरिष्ठ पत्रकार आणि महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ डिजिटल मीडिया चे सोलापूर जिल्हाध्यक्ष व सुयश मिडीयाचे ब्युरो चिफ महेश गायकवाड यांना जाहिर झाला आहे.

बाळासाहेबांची शिवसेना शिंदे गट आणि सोनार हक्क परिषद स्वराज्य पोलीस मित्र आणि पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटना अक्कलकोट यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा १११ सुवर्ण रत्नांचा सन्मान सोहळा यामधील आद्य पत्रकार दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार सोलापूर जिल्ह्यातील वरिष्ठ पत्रकार महेश गायकवाड यांना जाहिर झाला आहे.

या पुरस्काराची घोषणा पंढरपूर येथील मुकुंद वेदपाठक, आंबेजोगाई येथील राजेश भाऊ पंडित, सोलापूर येथील सुनील पंडित, भंडारकवठे येथील संतोष दीक्षित पुणे वाघोली येथील गणेश क्षिरसागर यांच्या निवड समितीने अक्कलकोट येथे केली आहे १११ सुवर्ण रत्नांचा सन्मान सोहळा समितीचे प्रमुख आणि ज्येष्ठ पत्रकार व उद्योजक आणि सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत दादा वेदपाठक तसेच निवड समितीने राज्यभरातून विविध क्षेत्रात उत्तम व आदर्श कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या विविध पुरस्कारासाठी निवडी जाहिर केल्या आहेत



सोलापूर जिल्ह्यातील वरिष्ठ पत्रकार आणि सुयश मीडिया ग्रुपचे ब्युरो चिफ महेश गायकवाड यांनी गेल्या ४२ वर्षापासून वृत्तपत्र क्षेत्रात राहून अनेक गुंतागुंतीच्या प्रकरणाला वाचा फोडून अनेकाना आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून न्याय मिळवून दिला आहे. रोखठोक आणि निर्भीड पत्रकार म्हणून सोलापूर जिल्ह्यात त्यांची ओळख आहे. आंबेडकरी चळवळीचे अभ्यासू पत्रकार म्हणून महेश गायकवाड यांची सोलापूर जिल्ह्यात ओळख आहे. सुयश मीडिया ग्रुप च्या माध्यमातून त्यांनी तळागाळातील जनतेच्या प्रश्नावर वाचा फोडून त्यांच्या अडीअडचणी दूर केल्या आहेत.

त्यांच्या या निर्भीड आणि रोखठोक पत्रकारितेची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय आद्य पत्रकार दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर आदर्श पत्रकार पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

या पुरस्काराचे वितरण विविध मान्यवरांच्या उपस्थितीत आणि अनेक नामवंतांच्या हस्ते रविवार दिनांक १८ मे २५ रोजी दुपारी २ वाजता फत्तेसिंह चौक येथील सर्जेराव सभागृह येथे प्रदान करण्यात येणार आहे

या सुवर्ण रत्नांचा सन्मान सोहळा कार्यक्रमात सोलापूर जिल्ह्यातील तमाम जनतेने नागरिकांनी आणि सामाजिक संस्था व सामाजिक मंडळानी उपस्थित रहावे असे आवाहन संयोजन समिती च्या वतीने कार्यक्रमाचे आयोजक चंद्रकांत दादा वेदपाठक यांनी केले आहे.

## मातोळा श्री माधवराव भोसले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावीचा १०० टक्के निकाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : औसा तालुक्यातील मातोळा येथील ज्ञान प्रसारक मंडळ येरमाळा संचलित श्री माधवराव भोसले माध्यमिक व उच्च माध्यमीक विध्यालयाचा बारावीचा निकाल १००% लागला असुन मातोळा येथील माधवराव भोसले ही संस्था एक अग्रगण्य संस्था असुन प्रत्येक वर्षी दहावी बारावी सह अनेक परीक्षाच्या माध्यमातुन विद्यार्थी घडविण्याच काम या संस्थेने केले असुन ग्रामिन भागातील विद्यार्थ्यांना माधवराव भोसले विद्यालय हे पर्वणी असुन मातोळा येथील श्री माधवराव भोसले माध्यमिक व उच्च माध्यमीक विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी सुसज्य संगणक लॅब, पुस्तके वाचण्यासाठी ग्रंथालय, विद्यालयाचा परीसर स्वच्छ, सुंदर, पर्यावरण पुरक झाडे असलेला परीसर असुन शाळेतील मुलींच्या सुरक्षेसाठी शाळेत सि.सि.टी.वि. कॅमेरे सह सुसज्य प्रशस्त ईमारत असुन अनुभवी शिक्षकवृद असलेले माधवराव भोसले हे विद्यालय आहे. बारावीच्या निकालात परंपरागत १००% निकाल देत विज्ञान शाखेत गूंड गिता बिरु ८३.५०% गुण घेत अव्वल आली असुन वाणिज्य शाखेमध्ये सिताराम सुभाष पवार ७०.००% गुण घेत प्रथम कृमांक पटकवला असुन कला शाखेत शिवम राजेंद्र फुलसुंदर ६२.३३ गुण घेत अव्वल येण्याचा बहुमान प्राप्त केला असुन बारावी पास विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष अनिलभाऊ मोहेकर, सचिव डॉ अशोकराव मोहेकर, संचालक संजय किसनराव भोसले, शालेय समिती अध्यक्ष डिगंबर भोसले, शालेय समिती सदस्य मधुकर भोसले, अमर भोसले आण्णासाहेब भोसले, गोविंद भोसले, शाळेचे मुख्याध्यापक प्राचार्य अजीत साळवे, पर्यवेक्षक डबेसह सर्व शिक्षकवृंद व मातोळा ग्रामस्थांनी उत्तीर्ण विद्यार्थ्याचे अभिनंदन केले.

**मंगळवेढा तालुका कृषी कार्यालयाच्या सभागृहामध्ये कृषी अधिकारी विमा कंपनीचे अधिकारी व शेतकऱ्यांसमवेत घेतली आढावा बैठक**

# आठ दिवसात पिक विमा संदर्भातील सर्व तक्रारींचा निपटारा करा आमदार समाधान अवताडे यांचा विमा अधिकाऱ्यांना सूचना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर मंगळवेढा मंगळवेढा मतदारसंघांमध्ये शेतकऱ्यांनी भरलेल्या खरीप पिक विम्यामध्ये विमा कंपनीकडून मोठ्या प्रमाणात अनियमितता केली असून अर्धा हेक्टर क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यालाही ५१९७ व ३ हेक्टर क्षेत्र असलेल्या शेतकऱ्याला ही ५१९७ रुपयेच विमा मंजूर केला असल्याचे शेतकऱ्यांनी आमदार समाधान आवताडे यांनी आयोजित केलेल्या बैठकीत उघडकीस आणले त्यामुळे विमा कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना आमदार समाधान आवताडे यांनी जाब विचारत आठ दिवसात शेतकऱ्यांच्या सर्व तक्रारी मार्गी लावा अन्यथा मी तुमच्या वरिष्ठासोबत शासन स्तरावर बैठक लावून विमा कंपनीवर कारवाई करण्यास भाग पाडेन असा इशारा आमदार समाधान आवताडे यांनी विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांना दिला यावेळी माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, उपविभागीय कृषी अधिकारी बाळासाहेब लांडगे,तालुका कृषी अधिकारी मंगळवेढा मनीषा मिसाळ,पंढरपूर तालुका कृषी अधिकारी सूर्यकांत मोरे इन्शुरन्स कंपनीचे प्रतिनिधी उमेश पळसे माजी सभापती प्रदीप खांडेकर, अजित जगताप सोमनाथ माळी औदुंबर वाढदेकर यांचे सह अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.






आमदार समाधान आवताडे यांनी शनिवारी सकाळी दहा वाजता मंगळवेढा तालुका कृषी कार्यालयाच्या सभागृहामध्ये कृषी अधिकारी विमा कंपनीचे अधिकारी व शेतकऱ्यांसमवेत आढावा बैठक घेतली या बैठकीमध्ये मतदार संघातील सर्रास शेतकऱ्यांनी विमा कंपनी विरोधात तक्रारी केल्या खरीप हंगाम २०२३-२०२४ हंगामा करता भरलेल्या विमा पॉलिसी मध्ये कंपनीच्या नियमानुसार ७२ तासाच्या आत नुकसानीची माहिती देणे बंधनकारक होते त्यानुसार ७२ तासाच्या आत माहिती देऊनही अनेक शेतकऱ्यांचे पंचनामे ही झाले नाहीत व त्यांना मदत ही मिळाली नाही ज्यांना विमा मंजूर झाला व ज्यांना ना मंजूर झाला त्या कोणत्याही शेतकऱ्यांचा याद्या कंपनीकडून उपलब्ध करून दिल्या जात नाहीत किंवा कंपनीच्या संकेतस्थळावर प्रकाशित केल्या नाहीत कंपनीच्या प्रतिनिधींनी काही शेतकऱ्यांना हाताशी धरून ठराविक लोकांचे पंचनामे केले आहेत अशा लेखी तक्रारी शेतकऱ्यांनी आमदार समाधान आवताडे यांच्याकडे या बैठकीत दिल्या.

**यावेळी आमदार अवताडे यांनी विमा कंपनीच्या अधिकाऱ्याला आठ दिवसात शेतकऱ्यांचा सर्व तक्रारी मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या आहेत त्याचबरोबर मंजूर झालेल्या १४ कोटी २७ लाख रुपयांच्या विमा रकमेचा आढावा त्यांनी घेत शेतकऱ्यांचा खात्यावर ही रक्कम जमा होण्यास सुरू असल्याचे सांगितले उडीद, सूर्यफूल, करडई या पिकांचा विमा संरक्षित पिकांमध्ये समावेश करण्यासंदर्भात प्रयत्न करणार असल्याचे आमदार अवताडे यांनी सांगितले त्याचबरोबर स्वयंचलित हवामान केंद्रे तालुक्यामध्ये २६ ठिकाणी मंजूर असून ती अद्याप का बसवली नाहीत याबाबत ही आढावा घेत तत्काळी हवामान केंद्र उभारण्याच्या सूचना दिल्या. त्याचबरोबर खाते बी बियाणे लवकरच उपलब्ध करून घ्यावीत त्यासाठी दुकानदाराने आतापासूनच तयारी करावी, जलतारा प्रकल्प सर्व शेतकऱ्यांनी राबवावा अशा सूचनाही आ आवताडे यांनी दिल्या.**

यावेळी विजयसिंह देशमुख, शशिकांत चव्हाण दत्तात्रय जमदाडे प्रवीण खवतोडे संजय कट्टे, बाळासाहेब सावंत, तुकाराम कुरे, विनायक यादव, शाम आकळे, जीवन पवार यांचेसह शेतकरी कृषी अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.